॥ श्रीगणेशायनमः ॥ ॥ श्री दत्त कृपा ॥
हॉटेल बळीराजा
फॅमिली गार्डन रेस्टॉरंट अॅण्ड फास्ट फूड
* साऊथ इंडियन * पंजाबी * चायनीज * तंदूर * महाराष्ट्रीयन
नाष्टा व जेवणाची उत्तम सोय
संपर्क : 8999854954, 8668738334
पत्ता : धुळे-सोलापूर हायवे, बिंदुसरा डॅम जवळ, मंझरी-कर्जनी फाटा, पाली बीड



सायं.दैनिक बीड प्रारंभ
संपादक-जालिंदर ज्ञानदेव धांडे



हॉटेल गौरव
रेस्टो बार, डिलक्स रूम
एसपी ऑफिससमोर, बार्शी रोड, बीड
प्रो.प्रा.नितीन खोड
एक वेळ आवश्य भेट द्या



बीड (महाराष्ट्र) ■ वर्ष ५ वे ■ अंक ३३४ ■ रविवार, दि. ०८ फेब्रुवारी २०२६ ■ Reg.No.L SB/BEED/RNP.269/2026-2028 ■ RNI MAHMAR/2021/81481 ■ किंमत ३ रुपये ■ पाने-४
Beed (Maharashtra) ■ Years-5 ■ Issu-334 ■ Sunday, 08 February-2026 ■ Reg.No.L SB/BEED/RNP.269/2026-2028 ■ RNI MAHMAR/2021/81481 ■ Price-3 rupees ■ Pages-4


# कर्जमाफीसाठी पोर्टल तयार

## मुद्दल,व्याजीची द्यायची माहिती, समितीत नवीन सदस्यांची नियुक्ती

प्रारंभ । वृत्तसेवा

नागपूर: महायुती सरकारने शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यासोबत त्यातून बाहेर काढण्याकरिता उपाययोजना सूचविण्यासाठी समिती गठीत केली आहे. या समितीने आता कामाला गती दिली असून एक पोर्टलही तयार केले आहे. थकबाकीदारांसह वर्ष २०२० पासून नियमित कर्ज फेडणाऱ्यांची माहिती या पोर्टलमध्ये भरण्यास सांगितले आहे.प्रथम देवेंद्र फडणवीस यांच्या काळात दीड लाखांपर्यंतचे कर्जमाफ करण्यात निर्णय घेण्यात आला होता. दीड लाखांवरील कर्जाची रक्कम भरल्यावरच या माफीचा लाभ मिळण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना कर्जमाफी देण्यात आली. त्यावेळी दोन लाखांपंतच्या कर्जाची रक्कम सरसकट माफ करण्यात आली होती. मागील वर्षी खरीप हंगामात अतिवृष्टी व पूरपरिस्थितीमुळे शेतपिकांचे प्रचंड नुकसान झाले.



शासनाने वाढीव मदत दिली. नुकसानाच्या तुलनेत मदतीची रक्कम कमी असल्याची टीका विरोधकांनी केली. त्यानंतर प्रहार संघटनेचे प्रमुख व माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांनी कर्जमाफीसाठी आंदोलने केले. त्यानंतर राज्य शासनाने कर्जमाफीसाठी एक अभ्यास समिती गठीत करून ३० जून २०२६ पर्यंत यावर निर्णय घेणार असल्याचे स्पष्ट केले. समितीकडून तीन महिन्यात फारसे काम करण्यात आले नाही. आता मात्र समितीने प्रत्यक्ष कामाला गती दिल्याचे दिसते.

सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार समितीने एक पोर्टल विकास केले आहे. यात ३० जून २०२५ पर्यंत थकबाकीदार असलेले शेतकरी, त्याच प्रमाणे वर्ष २०२० पासून नियमित कर्जाची परतफेड करणारे शेतकरी, अशांची माहिती या पार्टलवर भरावयाची आहे.

संबंधित शेतकऱ्याने उचल केलेली एकूण रक्कम (मुद्दल) व त्यावरील व्याज, अशी शेतकरीनिहाय माहिती द्यायची आहे. त्याच प्रमाणे नियमित कर्जफेडणाऱ्यांच्या संदर्भातही त्याने उचल केलेली व परत केलेल्या रकमेची माहिती भरायची आहे.

### समितीत नवीन सदस्यांची नियुक्ती

राज्यातील शेती क्षेत्रात आणि शेतकऱ्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवून शेतकऱ्यांची थकीत कर्जाच्या विळख्यातून सोडवणूक करण्यासाठी अल्पकालीन व दीर्घकालीन उपाययोजना करण्याबाबत शासनास शिफारसी करण्यासाठी मुख्यमंत्र्यांचे आर्थिक सल्लागार प्रवीण परदेशी यांच्या अध्यक्षेत समिती गठीत केली आहे. आता तीन महिन्यानंतर या समितीत नव्याने चार सदस्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पूर्वी या समिती ९ जणांचा समावेश होता. आता १३ जणांची समिती करण्यात आली

# स्वच्छ, सुंदर बीडसाठी आ.विजयसिंह पंडित यांचा पुढाकार!

## शिवजयंती व रमजान सणाच्या पार्श्वभुमीवर विशेष स्वच्छता मोहिम, स्वच्छता, विद्युत व पाणी पुरवठा विभागाच्या बैठकीत निर्णय

प्रारंभ । वृत्तसेवा

बीड : छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जन्मोत्सवाच्या निमित्ताने व मुस्लिम बांधवांचा पवित्र रमजान महिना सुरु होत असल्याने स्वच्छ, सुंदर बीडसाठी आ. विजयसिंह पंडित यांनी पुढाकार घेतला आहे. नगर पालिकेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा श्रीमती प्रेमलताताई पारवे, उपाध्यक्ष विनोद मुळूक, नगराध्यक्ष प्रतिनिधी शेख मुजीब यांच्यासह पदाधिकाऱ्यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या बैठकीत आ. विजयसिंह पंडित यांनी स्वच्छता, विद्युत व पाणी पुरवठ्याच्या आढावा बैठकीत शहरात विशेष स्वच्छता मोहिम प्रभागनिहाय सुरु करून बंद असलेले पथदिवे तात्काळ दुरुस्त करावेत, आवश्यक ठिकाणी नव्याने लाईट बसविण्यात यावेत, शहरातील नळ पाणी पुरवठा वेळेत करण्यात यावा, पाणी सुटण्याचे वेळापत्रक नागरीकांना कळविण्यात यावेत अशा सूचना पालिका प्रशासनाला दिल्या आहेत. यावेळी मुख्याधिकारी शैलेश फडसे गटनेते फारुक पटेल, स्वच्छता सभापती शेख निजाम, नगरसेवक मोईन मास्टर, नगरसेवक अमर नाईकवाडे यांची उपस्थिती होती.

शनिवार, दि.७ फेब्रुवारी रोजी बीड नगर परिषदेच्या स्वच्छता, विद्युत व पाणी पुरवठा विभागाचा आढावा घेण्यात आला, यावेळी ते पालिका प्रशासनाशी बोलत होते. शहरातील जनतेने विकासासाठी भरभरून आशिर्वाद दिलेले आहेत, त्यामुळे आता शहरातील जनतेला पालिकेच्या माध्यमातून मुलभूत सुविधा मिळायलाच हव्यात, या सुविधा मिळवून देण्यासाठी आम्ही कटीबध्द आहोत. रस्ते, नाल्या व पाणी पुरवठ्याबरोबरच शहरातील स्वच्छता नियमित होणे महत्वाचे आहे. यासाठी ही विशेष मोहिम राबवणे गरजेचे आहे, यात



कसलीही दिरंगाई नको अशा सूचना त्यांनी यावेळी पालिका प्रशासनाला केल्या. जनतेने निवडून दिलेल्या नगरसेवकांच्या जनहिताच्या कामांकडे कर्मचाऱ्यांनी दुर्लक्ष करता कामा नये. स्वच्छता, विद्युत व पाणी पुरवठ्याच्या संदर्भात कसलाही हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही असे कडक निर्देश त्यांनी दिले आहेत.

यावेळी उपस्थित नगरसेवकांनी आपल्या सूचना, प्रश्न या बैठकीत मांडले.

या बैठकीला ज्येष्ठ नगरसेवक सादेक अली, अशफाक इनामदार, जैतुल्ला खान, महेश धांडे, सय्यद इलियास, रंजित बनसोडे, जकी सौदागर, प्रमोद शिंदे, शेख बिलाल, शेख खय्युम, भैय्यासाहेब मोरे, शाहेदभाई पटेल यांच्यासह पाणी पुरवठा अभियंता प्रमोद माने, विद्युत अभियंता उदय इपिल्ली, विजय गाडेकर, स्वच्छता विभाग प्रमुख गणेश पगारे, स्वच्छता निरीक्षक भागवत जाधव, भारत चांदणे, शशिकांत >> पान २ वर...

# देशात आतापर्यंत कोणत्याच सरकारला जमले नाही ते मोदी सरकारने करून दाखवले - सलीम जहाँगीर

## अल्पसंख्याक मंत्रालयासाठी ३४०० कोटींची तरतूद ; मुस्लिम समाजाच्या हिताचा विचार



बीड । प्रतिनिधी

देशात आतापर्यंत कोणत्याच सरकारला जमले नाही ते पंतप्रधान नरेंद्रभाई मोदी यांनी करून दाखवले आहे. देशाच्या इतिहासात आजपर्यंत कधीच झाली नाही एवढी तरतूद अल्पसंख्यांक मंत्रालयासाठी करण्यात आली आहे. तब्बल ३४०० कोटींची तरतूद करत मोदी सरकारने देशातील तमाम मुस्लिम आणि अन्य अल्पसंख्यांक समाजाच्या आर्थिक उन्नतीचे उद्दिष्ट समोर ठेवले. मोदी सरकारचा हा निर्णय मुस्लिम समाजाला विकासाच्या प्रवाहात आणून त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविणारा असल्याचे भाजपचे प्रदेश महामंत्री सलीम जहाँगीर यांनी म्हटले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस , भाजप नेत्या पंकजाताई मुंडे, डॉ. प्रीतमताई मुंडे यांच्या नेतृत्वाखाली राज्यातील मुस्लिम समाज देखील मोठ्या प्रमाणात विकासाच्या प्रवाहात येऊ लागला आहे असेही सलीम जहाँगीर यांनी सांगितले.केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी देशाच्या अर्थसंकल्प २०२६ -२७ संसदेत सादर केला. या अर्थसंकल्पात अल्पसंख्याक कार्य मंत्रालयासाठी ३४०० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. ही रक्कम मागील आर्थिक वर्षातील ३ हजार ३९५ कोटींच्या तुलनेत ४.३८ कोटींनी अधिक आहे. या तरतुदीतून

>> पान २ वर...

# सुनेत्रा पवार आव्हान पेलतील-सयाजी शिंदे





मुंबई । प्रतिनिधी

अभिनेते सयाजी शिंदे यांनी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना बारामती येथे श्रद्धांजली वाहिली. यावेळी बोलताना त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. महाराष्ट्र घडविण्यात पवार कुटुंबाचा मोठा वाटा आहे. शरद पवार यांचे विचार पुढे नेण्याचे काम अजित पवार नेटाने करत होते. त्यांची स्वप्न पूर्ण करण्याची आपल्यावर आणि विशेषतः सुनेत्राताई पवार, सुप्रिया

>> पान २ वर...

# स्व. अमोल गलधर यांच्या जयंतीनिमित्त लिंबागणेश येथे रक्तदान शिबिराचे आयोजन

लिंबागणेश । प्रतिनिधी

स्व. अमोल गलधर यांच्या जयंतीनिमित्त आज रविवार दि. ०८ रोजी बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात स्व. अमोल गलधर युवा मंच, लिंबागणेश यांच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात स्व. अमोल गलधर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आली. यावेळी लिंबागणेश प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. ऋषिकेश आंधळे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच डॉ. गणेश ढवळे, सरपंच बालासाहेब जाधव,



सेवा सोसायटीचे चेअरमन रविंद्र निर्मळ, पत्रकार हरिओम क्षीरसागर यांनी स्व. अमोल गलधर यांच्या सामाजिक कार्याचा व जनतेसाठी दिलेल्या लढ्याचा गौरवपूर्ण आढावा घेतला.

स्व. अमोल गलधर यांनी बीड रेल्वेसाठी उभारलेला संघर्ष, टॉवरवर चढून केलेले शोले स्टाईल आंदोलन, आकाशवाणी बंद पाडण्याचे आंदोलन, तसेच तत्कालीन केंद्रीय रेल्वेमंत्री ममता बॅनर्जी यांच्या पुतळ्याचे दहन करून त्याची राख शासकीय कार्यालयात पाठवण्याचे धाडसी आंदोलन यामुळे ते सर्वसामान्य जनतेत लोकप्रिय होते. यासोबतच बीड जिल्हा रुग्णालयात गोरगरिबांच्या सेवेसाठी त्यांनी केलेले >> पान २ वर...

# जिल्ह्यातील संत,महंत,महाराज मंडळींनी घेतली पवार कुटुंबाची सांत्वनपर भेट

बीड । प्रतिनिधी

दिवंगत नेते अजित दादा पवार यांच्या अपघाती निधनानंतर जिल्ह्यातील संत, महंत मठाधिपती , महाराज मंडळी यांनी बारामती येथे जाऊन पवार कुटुंबाचे सांत्वन पर भेट घेतली. यावेळी दिवंगत नेते स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या आठवणींना उजाळा दिला. बीड जिल्ह्याच्या अध्यात्मिक क्षेत्रामध्येही दादांचे मोठे सहकार्य आहे . तीर्थक्षेत्र विकास योजने अंतर्गत अनेक देवस्थानच्या विकास कामांना प्राधान्य दिले होते. बीड जिल्हा आणि पवार कुटुंबाचं नातं हे अनोखे राहिलेल आहे. दादा गेल्याने खूप मोठी हानी झाली अशा भावना बीड जिल्ह्यातील संत महंत मंडळींनी व्यक्त केल्या.

बारामतीच्या विद्या प्रतिष्ठान येथे खा. शरदचंद्र पवार साहेब , पार्थ दादा पवार,



जय पवार यांच्या उपस्थितीत सांत्वनपर भेट व श्रद्धांजली कार्यक्रम संपन्न झाला.

बीड जिल्ह्यातील श्रीक्षेत्र नगद नारायण गडाचे ह भ प महंत शिवाजी महाराज, श्री ह भ प महंत लक्ष्मण महाराज मेंगडे बंकट स्वामी संस्थान नेकनूर श्री ह भ प योगीराज महाराज रामगडकर महंत राधाताई सानप, संत मिराबाई संस्थान पाटोदा,महंत नवनाथ महाराज जरूड, महंत महादेव महाराज बोराडे, रामकृष्ण महाराज रंधवे बापू, उत्तराधिकारी संभाजी महाराज नारायण गडकर,श्री ह भ प प्रा नाना महाराज कदम, श्री ह भ प सुरेश महाराज जाधव, महंत तुकाराम महाराज भारती ,मारुती महाराज >> पान २ वर...

# जपानच्या सागा प्रांताच्या गव्हर्नरच्या शिष्टमंडळाने घेतली पंकजा मुंडेंची भेट

मुंबई । प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांची आज जपानमधील सागा प्रांताचे गव्हर्नर व उच्चस्तरीय शिष्टमंडळाने भेट घेऊन पर्यावरण, प्लास्टिक मुक्ती, शिक्षण आदी विविध विषयांवर सविस्तर चर्चा केली.नदी पुनरुज्जीवन आणि प्लास्टिकमुक्त जलस्रोत हा राज्याचा प्राधान्यक्रम असून यासाठी जपानचे सहकार्य मोलाचे ठरेल असा विश्वास पर्यावरण व दुग्धविकास मंत्री श्रीमती मुंडे



यांनी यावेळी व्यक्त केला.

समुद्रातील व नदीतील प्रदूषण रोखणे, प्लास्टिक कचऱ्याविरुद्ध संयुक्त प्रयत्न करणे तसेच शिक्षण, पशुसंवर्धन आणि सौंदर्यप्रसाधन उद्योग क्षेत्रात सहकार्य वाढविण्याबाबतही यावेळी महाराष्ट्र आणि जपानच्या शिष्टमंडळात सकारात्मक चर्चा झाली. पर्यावरण व वातावरणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या 'रामटेक' या शासकीय निवास्थानी झालेल्या या बैठकीला जपानच्या सागा प्रांताच्या शिष्टमंडळाचे नेतृत्व सागा प्रांताचे गव्हर्नर योशिनोरी यामागुची यांनी केले. त्यांच्यासमवेत प्रादेशिक देवाणघेवाण विभागाचे उपमहासंचालक मसाहिरो ओनो, आंतरराष्ट्रीय धोरण गटाचे उपसंचालक कोजी योशिताके, प्रकल्प प्रमुख कोकी कनामारू आणि जेट्रो सागाचे मुख्य संचालक हिरोशी योनेयामा उपस्थित होते.

तर राज्याचे पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय आणि मत्स्य व्यवसाय विभागाचे सचिव डॉ. एन. >> पान २ वर...

# वाळू माफियांचा धुमाकूळ; महिला तलाठ्यावर ट्रॅक्टर घालण्याचा प्रयत्न करणाऱ्या १३ जणांवर गुन्हे

अंबड। प्रतिनिधी

८ ते १० दिवस मेडिकल रजेवर असलेले तहसीलदार परत हजर होऊन वाळू माफ यावर धडाकेबाज कारवाई सुरू केल्या यामुळे वाळू माफिया यांच्या झोपा उडाल्या. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार विजय चव्हाण यांचा 'अ‍ॅक्शन प्लॅन'; वाळू चोरांवर आता 'एमपीडीए' आणि 'मोक्का'ची कारवाई करण्यात येणार आहे. ६ फेब्रुवारी रोजी अंबड तालुक्यातील सुकना नदीपात्रात आवा/अंतरवाला परिसर) रात्रीच्या अंधारात अवैध वाळू उपसा करणाऱ्या आणि कारवाईसाठी गेलेल्या महिला तलाठ्याच्या अंगावर ट्रॅक्टर घालून त्यांना जिवे मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या वाळू माफियांवर प्रशासनाने मोठी कारवाई केली आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली आणि तहसीलदार विजय चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या धडक कारवाईत १३ जणांवर यात ५ खबऱ्यांचा समावेश) गंभीर कलमांखाली गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.



वरिष्ठ अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन व नेतृत्व ही धडक कारवाई जिल्हाधिकारी अशीमा मित्तल मॅडम यांच्या आदेशान्वये, तसेच अपर जिल्हाधिकारी श्री. रमेश मिसाळ, निवासी उपजिल्हाधिकारी श्री. शशिकांत हदगल आणि उपविभागीय दंडाधिकारी श्री. उमाकांत पारदी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या संपूर्ण कारवाईचे नियोजन आणि प्रत्यक्ष नेतृत्व अंबडचे तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी श्री. विजय चव्हाण यांनी केले. नेमकी घटना आणि पार्श्वभूमी: गेल्या काही दिवसांपासून अंबड तालुक्यातील सुकना नदीपात्रातून मोठ्या प्रमाणावर अवैध वाळू उपसा होत असल्याच्या तक्रारी प्राप्त होत्या. यापूर्वी अनेकदा महसूल पथकाने कारवाईचा प्रयत्न केला, परंतु वाळू माफियांचे 'खबरी' अधिकाऱ्यांच्या हालचालींवर पाळत ठेवून (रेकी करून) वाळू चोरांना सतर्क करत असत, ज्यामुळे कारवाई निष्फळ ठरत होती. मात्र, यावेळी तहसीलदार विजय चव्हाण यांनी अत्यंत गोपनीय पद्धतीने सापळा रचला. या दरम्यान, सजा आलमगावच्या महिला तलाठी मीरा सखाराम कोल्हे व त्यांचे पथक कारवाईसाठी गेले असता, मुजोर वाळू माफियांनी त्यांच्या अंगावर ट्रॅक्टर घालून जिवे मारण्याचा प्रयत्न केला. सुदैवाने त्या बचावल्या. या गंभीर प्रकारानंतर प्रशासनाने कठोर पवित्रा घेत भारतीय न्याय संहिता, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता आणि पर्यावरण संरक्षण कायद्यान्वये गुन्हे दाखल केले आहेत.

यांच्यावर झाले गुन्हे दाखल (एकूण १३ आरोपी) अंबड पोलीस ठाण्यात दाखल एफ.आय.आर. (क्र. ००६४/२०२६) नुसार खालील लोकांवर कारवाई करण्यात आली आहे वाळू चोरी करणारे (ट्रॅक्टर मालक/चालक): कल्याण भाऊराव खडके, दत्ता पांडुरंग साकळकर, जमील जिलानी शेख, गणेश रामप्रसाद दसपुते, संभाजी कारभारी भागवत, मदन रामेश्वर चोपडे, आकाश ऋषींदर शिंदे आणि पवन सुरेश शिंदे. पाळत ठेवणारे (खबरी): विकास खंडागळे, अंकुश खंडागळे, बाळासाहेब रामप्रसाद दशपुते, सचिन पांडुरंग साकळकर आणि सोहेल जिलानी शेख. सदर कारवाईत अंदाजे ४,५०,००० रुपयांची ९० ब्रास वाळू चोरी उघडकीस आली आहे). तहसीलदारांचा कडक इशारा: आता इतर ठिकाणांचा नंबर! या कारवाईबाबत बोलताना तहसीलदार श्री. विजय चव्हाण यांनी स्पष्ट केले की "वाळू माफियांनी महिला अधिकाऱ्यावर हल्ला करून हद्द पार केली आहे. आता आम्ही केवळ गुन्हे दाखल करून थांबणार नाही. तालुक्यातील इतर ठिकाणी जिथे अवैध गौण खनिज उत्खनन सुरू आहे, त्या ठिकाणांची गोपनीय माहिती गोळा करण्याचे काम आमचे पथक करत आहे. त्या सर्वांवर लवकरच छापे टाकण्यात येतील. सराईत गुन्हेगारांवर तडीपारी, तसेच एमपीडीए आणि मोक्का अंतर्गत कारवाई प्रस्तावित करण्यात येत आहे. कुणाचीही गय केली जाणार नाही या कारवाईत तलाठी मीरा कोल्हे, मंडळ अधिकारी विलास राजपूत आणि महसूल पथकातील सर्व सदस्यांनी धाडसाने सहभाग नोंदवला. पुढील तपास पोलीस हवालदार आर. आर. हरकाळ करत आहेत.

# चिमुकल्यांच्या विविध कलाविष्काराने ग्रामस्थ भारावले

## शेकटा जि.प.शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

बीड। प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील चकलांबा केंद्र अंतर्गत असलेल्या जि.प.प्रा. शाळा शेकटा या शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन दि. ६ फेब्रुवारी रोजी सायंकाळी संपन्न झाले. यावेळी कार्यक्रमाची सुरवात दिपप्रज्वलनाने करण्यात आली. कार्यक्रमाचे उद्घाटन गटशिक्षणाधिकारी काळम पाटील, केंद्रप्रमुख सुधाकर सानप शालेस समिती अध्यक्ष भाऊसाहेब महानोर मुख्याध्यापक वाघ यांच्या हस्ते प्रतिमापुजनाने करण्यात आले. यावेळी कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून बद्रीनाथ डोंगरे,जाधव,दहिफळे, बांगर,बारगजे, मस्के, हाके,कोळेकर आदींची उपस्थिती होती.

चकलांबा केंद्राअंतर्गत येत असलेल्या जि.प.प्रा.शाळा शेकटा येथे दरवर्षी वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन मोठ्या उत्सात करण्यात येते. त्याचप्रमाणे याहीवर्षी स्नेहसंमेलनाचे आयोजन दि. ६ फेब्रुवारी रोजी करण्यात आले होते. यावेळी शेकटा येथील इयत्ता पहिली ते सातवी पर्यंतच्या वर्गात शिकणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांनी आपली कलाकारी सादर केली. आपल्या पाल्याची कला पाहून पालकही आनंदी झाल्याचे दिसून येत होते.




चिमुकल्यांनी अत्यंत दुर्गभ भागात राहून देखील अत्यंत सुरेख अशी कला सादर केली. ग्रामस्थांनी आपल्या पाल्याला अत्यंत सुरेख अशी साद दिली. शाळेच्या प्रागणात अत्यंत देखण्या स्वरुपाचे स्टेज उभारण्यात आल्याने ग्रामीण भागातही अशा प्रकारे स्नेहसंमेलन होवू शकते हेच एक प्रकारे शालेय समितीने दाखवून देण्याचा प्रयत्न केला. कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यासाठी शाळेच्या सर्व शिक्षक, शिक्षीका यांनी मोठे परिश्रम घेतले. मुख्याध्यापिका वाघ, काशिद, शिरसाट,बडे, कांबळे यांनी चिमुकल्यांना कला सादर करण्यासाठी तयार करून मोठे परिश्रम घेतले. कार्यक्रम देखना करण्यासाठी शालेय समिती अध्यक्ष भाऊसाहेब महानोर, उपाध्यक्ष राधा हाके,राजेंद्र महानोर, शहादेव शेंबडे, तुकाराम महानोर, शरद महानोर, बाबासाहेब डोईफोडे, विलास माने, उपसरपंच नारायण महानोर, भाऊसाहेब कर्डिले, युवराज टेहळे, भुजंग पवार, गणेश महानोर, मधुकर हापटे, चेअरमन भारत शेंबडे, फौजी प्रकाश महानोर, शरद नागरगोजे, तुकाराम शेंबडे, रमजान पठाण, तानाजी शेंबडे,महारुद्र महानोर, गोवर्धन थोरात, एकनाथ हाके, हरिश्चंद्र भारती, भरत हाके, रामेश्वर गाजरे, गणेश हाके, ज्ञानेश्वर कर्डीले सह आदींनी परिश्रम घेतले.

### शाळेला दिला संकणक संच भेट

शाळेस ग्रामस्थांच्या व शालेस समितीच्या सहकाऱ्यातून सामुदायिक वर्गणी करून एक तर जालना येथे एसरपीएफ मध्ये कार्यरत अलेले पोलीस व माजी विद्यार्थी विजय महानोर यांच्याकडून एक असे दोन संगणक संच भेट देण्यात आले. या संगणक संचामुळे विद्यार्थ्यांना संगणकीय ज्ञान घेता येईल.

# नागरिकांसाठी आरबीआयकडून बँकिंग तक्रार निवारणाची सुविधा

जालना। प्रतिनिधी

अलीकडील काळात जालना जिल्ह्यात बँकिंग व्यवहारांशी संबंधित तक्रारी, गैरसमज आणि काही अप्रिय घटना समोर आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर नागरिकांना बँकिंग तक्रार निवारण व्यवस्थेबाबत स्पष्ट व अधिकृत माहिती मिळावी यासाठी जिल्हा अग्रणी बँकेकडून प्रसिद्धी करण्यात आली आहे. बँकिंग व्यवहारांबाबत कोणतीही तक्रार असल्यास नागरिकांनी प्रथम संबंधित बँकेच्या अंतर्गत तक्रार निवारण यंत्रणेकडे तक्रार दाखल करावी. प्रत्येक बँकेच्या शाखा परिसरात तसेच बँकिंग ओम्बुड्समनबाबत तपशील ठळकपणे प्रदर्शित केलेले असतात.

तक्रार दाखल केल्यानंतर ३० दिवसांत समाधानकारक उत्तर न मिळाल्यास नागरिकांना थेट भारतीय रिझर्व्ह बँकेच्या एकात्मिक बँकिंग ओम्बुड्समन योजनेअंतर्गत तक्रार नोंदवता येते. यासाठी जिल्हा प्रशासन किंवा इतर शासकीय कार्यालयात जाण्याची आवश्यकता नाही. बँकिंग ओम्बुड्समन योजनेअंतर्गत एटीएम व्यवहार, खात्यातील चुकीची कपात, कर्ज व व्याजदर, चेक, डिजिटल फसवणूक, सेवा शुल्क, पेन्शन व विमा इत्यादी तक्रारींचे निवारण केले जाते. तसेच संबंधित यंत्रणेला दंडात्मक कारवाई करण्याचा आणि तक्रारदार ग्राहकांना नुकसानभरपाई देण्याचा अधिकार आहे. तक्रार निवारण सेवा पूर्णतः मोफत, ऑनलाइन आणि पारदर्शक असून, तक्रारींचा पाठपुरावा देखील ऑनलाइन पद्धतीने करता येतो. नागरिकांनी अफवा, गैरसमज किंवा आंदोलनाचा मार्ग न अवलंबता उपलब्ध अधिकृत तक्रार निवारण यंत्रणांचा वापर करावा, असे आवाहन जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक मंगेश केदार यांनी केले आहे.

# जामगावची निकिता झांबरे पोलीस दलात

## आ.सुरेश धस यांनी सत्कार करून दिल्या शुभेच्छा

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील जामगाव गावातील विद्यार्थिनी निकिता नितीन झांबरे ही नुकतीच पोलीस दलात भरती झाली आहे आष्टी शहरातील बाबाजी अकॅडमी मध्ये राहुल जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली तिने सराव करून हे यश संपादन केले आहे तिच्या या निवडीबद्दल जामगाव चे भूमिपुत्र आष्टी विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुरेश आण्णा धस यांनी तिचे व तिच्या वडिलांचे अभिनंदन करून स्वागत केले. मुली देखील आता प्रत्येक क्षेत्रामध्ये अग्रेसर होत असल्याचे चित्र सध्या दिसत आहे निकिताने लहानपणापासून मला पोलीस व्हायचे अशी स्वप्न पाहिली होती तिचे शिक्षण



निवृत्ती धस विद्यालय जामगाव येथे झाले तर उच्च माध्यमिक शिक्षण बीड हंबर्डे महाविद्यालयात झाले असल्याचे तिने सांगितले माझ्या मुलीने

जिद्द, चिकाटी व अथक परिश्रमाच्या जोरावर महाराष्ट्र पोलीस दलात यश संपादन केले असून, हे आपले स्वप्न आज साकार झाल्याची भावना कु. निकिता नितीन झांबरे हिचे वडील श्री. नितीन झांबरे यांनी व्यक्त केली.

"माझी मुलगी पोलीस दलात भरती व्हावी, हे स्वप्न होते. आज तिने केवळ माझेच नव्हे तर संपूर्ण गावाचे नाव उज्ज्वल केले आहे. या यशामागे आमचे आधारस्तंभ मराठवाडा भूषण लोकनेते आमदार सुरेश आण्णा धस तसेच देविदास आबा धस यांचे मोलाचे सहकार्य लाभले. त्यांच्या मार्गदर्शन व मदतीमुळेच माझ्या मुलीला पुढे जाण्यास आवश्यक बळ मिळाले," असे श्री. नितीन झांबरे यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले. तिच्या या निवडीबद्दल सतीश शेठ धस , विनोद रोडे स्वयंसहाय्यक आमदार सुरेश धस, रमेश गावडे भाजपा तालुकाध्यक्ष राजाभाऊ दहातोंडे,संतोष मुरकुटे माजी नगरसेवक माजी सरपंच संभाजी झांबरे आधी सह मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या. मुंबई येथे कारागृह पोलीस म्हणून तिची निवड झाली आहे.

# उत्तम शिक्षकांमुळे चांगल्या शिक्षणसंस्था उभा राहतात: कुलगुरू डॉ. स्वाती मुजुमदार

**पुणे । प्रतिनिधी**

पूर्वी शिक्षण क्षेत्रात विद्यार्थी घडविण्यासाठी आणि त्यांना शिकविण्यासाठी म्हणून शिक्षक येत असत. या क्षेत्रात नफा आणि तोट्याचा विचार होत नसे. ज्येष्ठ शिक्षणतज्ञ डॉ. शां. ब. मुजुमदार यांनी देखील शिक्षक म्हणून सुरुवात केली. त्यामुळे सिंबायोसिस शिक्षण संस्थेकडे पाहण्याचा सगळ्यांचा दृष्टिकोन वेगळा आहे. फक्त पायाभूत सुविधांनी शिक्षण संस्था चांगली होत नाही, तर उत्तम शिक्षकांमुळे चांगल्या शिक्षण संस्था उभ्या राहतात, असे मत सिंबायोसिस स्किल्स युनिव्हर्सिटीच्या कुलगुरू डॉ. स्वाती मुजुमदार यांनी व्यक्त केले.




रोटरी क्लब ऑफ पूना मिडटाउनच्या वतीने आयोजित सर्वोत्तम व्यावसायिक गुणवत्ता पुरस्कार प्रदान सोहळा टिळक रस्त्यावरील मराठा चेंबर ऑफ कॉमर्स च्या सभागृहात आयोजित करण्यात आला होता. यंदाचा व्होकेशनल एक्सलन्स अवॉर्ड विश्वकर्मा ग्रुपचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा. डॉ. बिपीन सुळे यांना प्रदान करण्यात आला. यावेळी क्लबचे अध्यक्ष डॉ. चंद्रशेखर वल्हवणकर , संचालक डॉ. हेमंत तोडकर, सचिव ड. शोभा सोमाणी आदी व्यासपीठावर उपस्थित होते. पुणेरी पगडी, शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह आणि सन्मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप होते.

डॉ. स्वाती मुजुमदार म्हणाल्या, पुण्यात अनेक शिक्षण संस्था आहेत. आज शिक्षण क्षेत्राचे बाजारीकरण झाले आहे. यामध्ये नफा महत्वाचा नाही. अनेक शिक्षकांना पगार जास्त आहेत. मात्र, चांगली गुणवत्ता टिकवून ठेवणे हे अवघड आहे. शिक्षण क्षेत्रात आवड म्हणून शिक्षक येत नाही. त्यामुळे ही स्थिती देशाला घातक आहे. प्रत्येक महाविद्यालयात कौशल्याधिष्ठित शिक्षण देणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. डॉ.बिपीन सुळे म्हणाले, रोटरी क्लब ही क्रियाभिमुख असलेली संस्था आहे. हातात घेतलेले काम पूर्ण करणारी ही विश्वसनीय संस्था असून अनेक सामाजिक उपक्रम संस्थेने राबविले आहेत.



# माजी खासदार स्वर्गीय रामरावजी आवरगावकर स्मृतिदिनानिमित्ताने अभिवादन

किल्ले धारूर । प्रतिनिधी

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक सदस्य माजी खासदार तथा बीड जिल्ह्यातील थोर स्वातंत्र्यसेनानी स्वर्गीय रामरावजी आवरगावकर यांच्या स्मृतीनिमित्ताने प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. बीड मधील बीड न्यूज या पहिल्या वृत्तपत्राचे आणि जिल्हा पत्रकार संघाचे ते प्रथम अध्यक्ष होते. माजी खासदार स्वर्गीय रामरावजी आवरगावकर यांनी धारूर सारख्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाची सुविधा उपलब्ध केली. धारूर सारख्या ठिकाणी विविध सोयी सुविधांची निर्मिती करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. याप्रसंगी उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड, पर्यवेक्षक प्रा. सच्चिदानंद ढेपे यांबरोबरच महाविद्यालयातील प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिर्डीत भाविकांचे दागिने चोरणारा श्रीरामपूरचा सराईत गुन्हेगार एलसीबीच्या जाळ्यात

अहिल्यानगर । प्रतिनिधी

साईनगरीत दर्शनासाठी येणार्या भाविकांच्या सुरक्षिततेवर डल्ला मारणार्या एका अट्टल आणि रेकॉर्डवरील गुन्हेगाराला स्थानिक गुन्हे शाखेने अत्यंत फिल्मी स्टाईलने बेड्या ठोकल्या आहेत. तामिळनाडूमध्ये दरोड्याच्या गुन्ह्यात तब्बल सात वर्षे तुरुंगवास भोगून आलेल्या विकास उर्फ राहुल गोडाजी चव्हाण या सराईत चोरट्याला अटक करण्यात आली असून त्याच्याकडून ७ चैन स्नॅचिंगचे गुन्हे उघडकीस आले आहेत. पोलिसांनी या कारवाईत अडीच लाख रुपये किमतीची सोन्याची लगड आणि गुन्ह्यात वापरलेली यामाहा मोटारसायकल हस्तगत केली आहे. साईनगरीत दहशत निर्माण करणार्या या टोळीचा मुख्य सूत्रधार आता पोलिसांच्या कोठडीत आहे.

धारवाड येथील एका भाविक कुटुंबातील महिलेच्या गळ्यातून पहाटेच्या सुमारास ११२ ग्रॅम सोन्याचे दागिने बळजबरीने हिसकावून नेल्यानंतर पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी या गुन्ह्याचा छडा लावण्याचे आदेश



स्थानिक गुन्हे शाखेला दिले होते. एलसीबीचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या पथकाने तांत्रिक कौशल्य आणि गुप्त बातमीदारांचे जाळे पसरवून माहिती काढली असता, श्रीरामपूरच्या अशोकनगर परिसरातील विकास चव्हाण यानेच आपल्या साथीदारासह हा धुमाकूळ घातल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी सापळा रचून विकासला ताब्यात घेतले. त्याने शिर्डीसह राहाता, संगमनेर आणि नाशिक जिल्ह्यातील सिन्नर परिसरात चैन स्नॅचिंग केल्याची कबुली दिली. या गुन्हेगाराचा क्राईम ग्राफ अत्यंत धक्कादायक असून, त्याने २००९ ते २०१६ या काळात तामिळनाडूमध्ये दरोड्याच्या गुन्ह्याची शिक्षा भोगली आहे. बाहेर आल्यानंतर त्याने पुन्हा राहुरी, कोपरगाव, श्रीरामपूर आणि तोफखाना पोलीस स्टेशनच्या हद्दीत जबरी चोर्यांचा सपाटा लावला होता. सध्या या गुन्ह्यातील त्याचे दोन साथीदार गणेश चव्हाण आणि राखी चव्हाण हे फरार असून पोलीस त्यांचा शोध घेत आहेत. या धडाकेबाज कारवाईमुळे शिर्डीत येणार्या भाविकांमध्ये काहीसा दिलासा मिळाला आहे. अट्टल गुन्हेगारांना पोलिसांनी दिलेला हा जबरदस्त दणका मानला जात आहे.

# धक्कादायक! काका व चुलत भावाकडून तरुणाची हत्या

अहिल्यानगर । प्रतिनिधी

सोनई-कांगोणी रस्त्यावरील वडघुले वस्ती येथे मंगळवार ३ फेब्रुवारी रोजी रात्री जुन्या घरी आल्याच्या कारणावरून चुलता व चुलत भावांनी भावाची हत्या केल्याची घटना घडली. या प्रकरणी सोनई पोलीस ठाण्यात चार जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गणेश दत्तात्रय वडघुले (वय ३६) रा. वडघुले वस्ती, कांगोणी रोड, सोनई हा जुन्या घरी आल्याच्या कारणावरून आरोपींनी कोयता, लोखंडी पाईप, शेतीसाठी लागणारे खोरे व लाकडी ठोकळ्याने डोक्यात मारले. यात गणेश वडघुले हा ठार झाला.

फिर्यादी हे त्यांचे भांडण सोडवण्यासाठी गेले असता आरोपींनी त्यांनाही मारहाण करून जखमी केले असल्याची फिर्याद हिराबाई दत्तात्रय वडघुले (वय ६०) रा. वडघुले वस्ती यांनी सोनई पोलीस ठाण्यात दिली. हिराबाई दत्तात्रय वडघुले यांच्या फिर्यादीवरुन पोलिसांनी विठ्ठल रंगनाथ वडघुले, भगवान विठ्ठल वडघुले, संभाजी विठ्ठल वडघुले, गौरी भगवान वडघुले सर्व रा. कांगोणी रोड, सोनई यांच्यावर भारतीय न्याय संहिता कलम १०३ (१), ११८(१), ११५(२), ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी सर्व आरोपींना ताब्यात घेतले आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय माळी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सुरज मेढे पुढील तपास करत आहे. दरम्यान काल आरोपींना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने विठ्ठल वडघुले, भगवान वडघुले, संभाजी वडघुले यांना दोन दिवस पोलीस कोठडी तर गौरी वडघुले हिस न्यायालयीन कोठडी देण्यात आली.

BEED PRARAMBH Newspaper Prin ed, Published and Owned by Jalinder Dnyandev Dhande and Printed at TULJABHAVANI PRINTERS, C/o Dnyandev Dhande, Sant Namdeo Nagar, Beed, Tq. Beed Dist.Beed Pin - 431122 (Maharashtra) and published at BEED PRARAMBH OFFICE, C/o Dnyandev Dhande, Sant Namdeo Nagar, Beed, Tq. Beed Dist.Beed Pin - 431122 (Maharashtra) Editor : Jalinder Dnyandev Dhande Email-prarambh2023@gmail.com

बीड प्रारंभ हे पत्रक मुद्रक, प्रकाशक, मालक जालिंदर ज्ञानदेव धांडे यांनी तुळजाभवानी प्रिंटर्स, द्वारा - ज्ञानदेव धांडे, संत नामदेवनगर, बीड, ता.बीड जिल्हा - बीड पिन - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून बीड प्रारंभ कार्यालय, द्वारा - ज्ञानदेव धांडे, संत नामदेवनगर, बीड, ता.बीड जिल्हा - बीड पिन - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.संपादक : जालिंदर ज्ञानदेव धांडे Email-prarambh2023@gmail.com




सायं.दैनिक
बीड
# प्रारंभ
रविवार, दि. ०८ फेब्रुवारी २०२६






## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व संसदरत्न खा.डॉ.श्रीकांत शिंदे यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा

**बीड । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षाचे मुख्य नेते मा. ना. श्री. एकनाथरावजी शिंदे साहेब व संसदरत्न मा. खा. श्री. श्रीकांतजी शिंदे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त श्रीमंत योगी प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा राजीव नगर बहिरवाडी बीड येथे शालेय विद्यार्थ्यांना गणवेश वाटप तसेच क्रिकेट, रनिंग, कबड्डी, खो-खो, रांगोळी, निबंध, हस्ताक्षर, चित्रकला स्पर्धांचे आयोजन करून विजयी खेळाडूंना बक्षीस वितरण कार्यक्रम शिवसेनेचे बीड जिल्हा संपर्कप्रमुख मा. श्री. मनोजजी शिंदे साहेब यांच्या शुभहस्ते संपन्न झाले.**



कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना आयोजक तथा शिवसेना जिल्हाप्रमुख ॲड. चंद्रकांत नवले यांनी आपल्या मनोगतामध्ये शिवसेनेच्या स्थापनेपासून आम्ही सदैव शिवसेनेसोबत असून यापूर्वी शिवसेनेचा जिल्हाप्रमुख असताना संपूर्ण जिल्ह्यात शहरासह गाव, वाडी, वस्ती, तांडा, इत्यादी ठिकाणी जाऊन शिवसेनेचे विचार सर्व सामान्य जनते पर्यंत पोहोचण्यासाठी गावोगावी शिवसेना शाखा स्थापन करून सामना हे वृत्तपत्र संपूर्ण जिल्हाभर पोहोचविण्याचे कार्य केले बीड जिल्ह्याच्या विकासामध्ये शिवसैनिकांचं आणि शिवसेना लोकप्रतिनिधींचा भरीव असं काम आहे मग ते सिंचन, रस्ते बांधकाम, विज , इरिगेशन, पाणीपुरवठा योजना क्रीडा संकुले, आदींसह भरीव काम असल्याचे सांगितले त्याचबरोबर जिल्हाभरातील तीन नगरपालिका चार पंचायत समिती तसेच बीड जिल्हा परिषद सुद्धा शिवसेना आणि मित्र पक्षांकडे होती. तसेच शाळा, महाविद्यालय, झुणका भाकर केंद्र विविध शैक्षणिक संस्था अठरापगड समाजातील कार्यकर्त्यांना मिळवून देवून शासकीय ठेकेदारी काय असते हे कार्यकर्त्यांना प्रत्यक्ष कामांच्या वर्क ऑर्डर देऊन शिकविले असल्याचे सांगितले. तसेच या आठवड्यामध्ये जिल्हा रुग्णालय बीड व उपजिल्हा रुग्णालय गेवराई येथे कर्करोग मुक्त बीड जिल्हा असे अजिंक्य मुळे आणि जिल्हा शिवसेना मिळून दोन कार्यक्रम घेतले यासाठी मुंबईवरून तज्ञ डॉक्टर बोलावले होते. येत्या नऊ तारखेला गेवराई येथील रुग्णालयामध्ये व शिवसेनेच्या शहर शाखेमध्ये भव्य रक्तदान शिबिर आयोजित केले आहे तसेच शिवसेना पदाधिकारी आपल्या विभागांमध्ये समाजोपयोगी उपक्रम राबवत आहेत. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून मा. श्री. मनोजजी शिंदे साहेब यांनी आपल्या भाषणामध्ये स्वर्गीय दिघे साहेबांना स्मरण करून भाषणाला सुरुवात केली यावेळी त्यांनी शिवसेना जिल्हाप्रमुख श्री. अनिल दादा जगताप व शिवसेना जिल्हाप्रमुख ॲड. चंद्रकांत आप्पा नवले यांचे भरभरून कौतुक केले हा कार्यक्रम तर मी संमती दिली आणि लगेच काही तासातच यशस्वीरित्या कार्यक्रमाचे आयोजन केले. तसेच त्यांच्या अनुभवाची आणि कार्यकुशीलतेची प्रशंसा करत मा. ना. श्री. एकनाथरावजी शिंदे साहेब हे नेहमी सांगत असतात या समाजामध्ये काम करत असताना बाळासाहेबांनी दिलेले विचार आणि स्वर्गीय आनंद दिघे साहेबांनी दिलेली शिकवण यामध्ये ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण. आता मी वेळोवेळी सगळीकडे फिरत असतो मी शहरांमध्ये शाळा पाहिलेले आहेत परंतु खेड्यापाड्यांमध्ये आणि ग्रामीण भागामध्ये शाळा चालवणं पाहिजे एवढं सोपं नाहीये परंतु चंद्रकांत नवले यांचे मी कौतुक करतो की त्यांनी ग्रामीण भागामध्ये एक चांगला प्रयत्न केलेला आहे आणि निश्चितच भविष्यामध्ये याचा वटवृक्ष झाल्याशिवाय राहणार नाही असा मला दृढविश्वास वाटतो. शिवसेना हा एकमेव पक्ष आहे जो कला, क्रीडा, सांस्कृतिक विभागाला जास्त महत्त्व देतो. मा. ना. श्री. एकनाथरावजी शिंदे साहेब यांचा वाढदिवस महाराष्ट्रातच नव्हे तर देशभर साजरा होतो आहे. हा वाढदिवस साजरा करत असताना सर्व विद्यार्थी उत्साही आणि आनंदात दिसत आहेत. संस्थेचे अध्यक्ष ॲड. चंद्रकांत नवले यांची सुद्धा तळमळ आणि उत्साह पाहून मला पण फार आनंद झाला. चंद्रकांत नवले यांना असं वाटत होतं की आज आपल्या शाळेवर स्वतः साहेब येत आहेत शिवसेनेचे सर्व पदाधिकारी येतायेत महिला पदाधिकारी येत आहेत सर्व मान्यवर येत आहेत आणि माझ्या मुलांचं आज खऱ्या अर्थाने कौतुक होणार आहे त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप पडणार आहे अशी मानसिकता असणारा नेता सुद्धा समाजामध्ये असणं गरजेचं आहे आणि असा नेता मला चंद्रकांत आप्पा मध्ये दिसला. म्हणून त्यांना जो आनंद त्यांच्या चेहऱ्यावर जो मी आनंद पाहिला त्यामुळे मला पण एक समाधान वाटलं. मला सर्व जिल्हाप्रमुखांचा अभिमान वाटतो. बीड जिल्हा काही ▶▶ पान २ वर...

## धानोरा खुर्द येथे गावकरी प्रत्येक शनिवारी राबवतात स्वच्छता मोहीम

अंबाजोगाई प्रतिनिधी

अंबाजोगाई तालुक्यातील धानोरा खुर्द येथे मुख्यमंत्री ग्राम समृद्ध अभियानांतर्गत आठवड्याच्या प्रत्येक शनिवारी ग्रामस्वच्छता अभियान राबविण्यात येत असून अभियाना अंतर्गत ग्रामस्थांच्या सहभागातून गाव स्वच्छ करून सुंदर होत आहे. गावातील रस्ते चौक चकाचक होत असून मुख्यमंत्री ग्राम समृद्ध अभियानात धानोरा खुर्द गाव अंबाजोगाई तालुक्यात अग्रेसर असल्याचे चित्र सध्या पाहण्यास मिळत आहे. गावकरी मोठया उत्साहाने स्वच्छता मोहीम राबवत आहेत. यामुळे गाव स्वच्छ सुंदर होत असल्याचे पाहण्यास मिळत आहे. स्वच्छता मोहीम राबवण्यासाठी गावातील महिला पुरुष वृद्ध शाळेतील विद्यार्थी मोठया उत्साहाने स्वच्छता मोहीम राबवत आहेत.




मुख्यमंत्री ग्राम समृद्धी अभियानांतर्गत धानोरा खुर्द ग्रामपंचायत आठवड्याच्या शनिवारी स्वच्छता मोहीम राबवण्यात येत असून धानोरा खुर्द ग्रामपंचायतने मुख्यमंत्री ग्राम समृद्ध या अभियान अंतर्गत गावातील रस्ते,नाली, जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा आणि उर्दू शाळा, मंदिर, मस्जिद ,ग्रामपंचायत, गावातील प्रत्येक चौकात स्वच्छता राबवण्यात येत आहे.

. स्वच्छता मोहीम राबवताना सरपंच पार्वतीबाई पोळ, उपसरपंच बालासाहेब गुणाले, ग्रामपंचायत अधिकारी प्रमोद जोगदंड, मुख्याध्यापक सूर्यकांत धायगुडे, शिक्षक कचरू रंजवे,सुरेश जगताप, दिलीपराव ढगे, भरत जगताप, उमेश कासले, बाळासाहेब जगताप,, नवाब सय्यद, अशोक ढगे,रमेश ढगे,रहमान पटेल असलम सय्यद, जमालोदिन सय्यद,महादेव पोळ, माऊली वाघमारे,कौशल्या ढगे, अश्विनी ढगे,बिस्मिला पठाण, शांताबाई सुरवसे,यांच्यासह गावातील बहुसंख्य नागरिक उपस्थित होते.

## नाळवंडी येथे संत शिरोमणी गुरु रविदास महाराज मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा संपन्न

बीड । प्रतिनिधी

तालुक्यातील नाळवंडी येथे समस्त चर्मकार बांधवांच्या एकजुटीतून आणि श्रद्धेतून साकारलेल्या संत गुरु रविदास महाराज यांच्या भव्य मंदिराचा लोकार्पण व मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. नाळवंडी ग्रामस्थांच्या आणि चर्मकार बांधवांच्या विशेष पुढाकाराने या देखण्या मंदिराची उभारणी करण्यात आली आहे.या मंदिराचे मुख्य आकर्षण म्हणजे चर्मकार समाजाच्या वतीने अर्पण करण्यात आलेला ४० किलो वजनाचा भव्य कळस. हा कळस सध्या संपूर्ण तालुक्यात चर्चेचा विषय ठरत आहे.



विधीवत पूजन आणि मंत्रोच्चारात संत गुरु रविदास महाराज यांच्या मूर्तीची मंदिरात प्रतिष्ठापना करण्यात आली.या सोहळ्यामुळे नाळवंडी परिसरात भक्तीचे वातावरण निर्माण झाले असून, बीड जिल्ह्यात या मंदिराची आणि समाजबांधवांच्या एकजुटीची विशेष चर्चा होत आहे.

## ढेकणमोहा येथे माता रमाई जयंती साजरी

ढेकणमोहा । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील ढेकणमोहा येथील मातोश्री रमाबाई आंबेडकर सेवाभावी संस्था ढेकणमोहा येथे बहुजनांची माऊली त्यागमूर्ती माता रमाई जयंती साजरी करण्यात आली या वेळी माता रमाई व डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रतिमेचे पूजन करण्यात आले. माता रमाबाई आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. त्यागमूर्ती रमाईंनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक कार्यात सावलीसारखे राहून,अत्यंत गरिबीत व संघर्षात संसार सांभाळला. या माता रमाई जयंतीच्यानिमित्ताने अभिवादन करण्यात आले. यावेळी जेष्ठ महिला गंगुबाई शिंदे, व कमलबाई शिंदे, शुभांगी शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले या प्रसंगी प्रमुख उपस्थिती जेष्ठ नेते हानुमान देवकते, कैलास देवकते, नागेश शिंदे, परमेश्वर थापडे (उपसरपंच) भारत देवकते (शिवसेना बीड तालुका उपाध्यक्ष), भाजपाचे नेते शामराव राऊत, नारायण देवकते (ग्रामपंचायत सदस्य) देवानंद शिंदे (ग्रामपंचायत सदस्य), शरद देवकते (ग्रामपंचायत सदस्य) गणेश कोकाटे, प्रकाश शिंदे सर ,सुदाम शिंदे ,कचराअप्पा शिंदे ,भगवान शिंदे, दराराज शिंदे ,अरविंद शिंदे ,बापुराव शिंदे ,अभिजीत शिंदे, शुभांगी शिंदे ,सुमनबाई शिंदे (ग्रामपंचायत सदस्य )निर्मला शिंदे, पदमीन शिंदे ,सोनाली शिंदे, मंगल शिंदे, कांताबाई शिंदे, कैकई शिंदे, दैवशाला साळवे, आम्रपाली शिंदे, हार्षनी शिंदे, विमल शिंदे ,शितल शिंदे, भाग्यश्री शिंदे, आसराबाई शिंदे, दोरकाबाई काळे, साक्षी शिंदे आदीची उपस्थित होते.



## कालिकादेवी विद्यालयात निरोप समारंभ मोठ्या उत्साहात संपन्न

शिरूर कासार । प्रतिनिधी

आदर्श शिक्षण संस्था बीड द्वारा संचलित,कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,शिरूर(का.)जि.बीड येथे इ.१० वी व १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी निरोप समारंभाचा कार्यक्रम भव्य-दिव्य स्वरूपात व मोठ्या उत्साहात संपन्न झाला.या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य केशव भांगे साहेब,प्रमुख अतिथी बीड येथील पोलीस उपनिरीक्षक श्रीमती पल्लवी जाधव मॅडम,शिरूर पोलीस स्टेशनचे सहा.पोलीस निरीक्षक मा.श्री प्रवीण जाधव साहेब,वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विश्वास कंधारे साहेब,माजी प्राचार्य व्ही.जी. काटे सर,बीड पोलीस-दामिनी पथकातील श्रीमती जाधव मॅडम,श्रीमती चौरे मॅडम,पत्रकार विजयकुमार गाडेकर पाटील या मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून लोकनेत्या स्व.केशरबाई(काकू)क्षीरसागर व लोकनेते स्व.सोनाजीराव(नाना)क्षीरसागर यांच्या प्रतिमां पूजनाने या कार्यक्रमाचा प्रारंभ झाला.व मान्यवरांच्या सत्कारानंतर विद्यार्थी वक्ते चिं.शोएब आतार, कु.आराध्या गिते,कु.सुप्रिया भाबड,कु.प्रगती तळेकर यांनी आपल्या मनोगतातून अनुभव आणि आठवणी सांगून सर्व रसिक प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले.तर



सहा.पोलीस निरीक्षक मा.श्री प्रवीण जाधव साहेब यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना अभ्यास,गुणवत्ता आणि सोशल मीडियाचा गैरवापर होणार नाही. याविषयी मार्गदर्शन केले.तर बीडच्या पोलीस उपनिरीक्षक श्रीमती पल्लवी जाधव मॅडम यांनी आपल्या भाषणातून,विद्यार्थ्यांना पुढील आयुष्यासाठी व भवितव्यासाठी विविध स्पर्धा परीक्षा,शाळा-महाविद्यालयातील मुलींची छेडछाड,बालविवाह,बालगुन्हेगारी का? वाढते त्याची कारणे व त्यावर उपायोजना म्हणजे विद्यार्थ्यांनी चांगल्या गोष्टीचे अवलोकन करण्यासाठी उपयुक्त असे विविध सल्ले दिले.तर माजी प्राचार्य व्ही.जी.काटे,वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विश्वास कंधारे सर यांनी दहावी व बारावीच्या वर्गातील विद्यार्थ्यांना निरोप समारंभाच्या शुभेच्छा देऊन पुढील वाटचालीसाठी दिशादर्शन केले.तर अध्यक्षीय भाषणातून प्राचार्य केशव भांगे साहेब यांनी सांगितले की,'निरोप समारंभ' या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस अधीक्षक,अप्पर पोलीस अधीक्षक,पोलीस निरीक्षक,पोलीस उपनिरीक्षक व सहा.पोलीस निरीक्षक तसेच शैक्षणिक क्षेत्रातील प्राचार्य, प्राध्यापक,विविध क्षेत्रातील मान्यवरांना येथे प्रमुख अतिथी म्हणून बोलवत असताना,या मान्यवराकडे पाहून आपणही अशा ▶▶ पान २ वर...

## बोगस राजमा बियाणे देऊन व्यापाऱ्याला १३ लाखांचा गंडा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

राजमा बियाणे पुरवठा करण्याच्या नावाखाली अंबाजोगाई येथील एका बियाणे व्यापाऱ्याची १२ लाख ८० हजार २०० रुपयांची फसवणूक झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात साताऱ्यातील 'येस फ्रेश फार्मर प्रोड्युसर कंपनी'च्या ६ संचालकांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



अंबाजोगाई येथील सुयश प्रेमचंद मुथा रा. गुरुवार पेठ, अंबाजोगाई हे बियाणे व्यवसायाचे काम पाहतात. जुलै २०२५ मध्ये साताऱ्याच्या 'येस फ्रेश फार्मर प्रोड्युसर कंपनी'चे संचालक संजय बाबासाहेब भगत आणि ओंकार संजय भगत यांनी मुथा यांची भेट घेऊन त्यांना राजमा बियाण्याचे उच्च दर्जाचे नमुने दाखवले होते. त्यानुसार मुथा यांनी २१ जुलै २०२५ रोजी एकूण ८५ टन राजमा खरेदीचा करार केला आणि आरटीजीएसद्वारे वेळोवेळी रक्कम जमा केली. करारानुसार ठरलेला माल तपासण्यासाठी मुथा साताऱ्याला गेले असता, तिथे दाखवल्याप्रमाणे चांगल्या दर्जाचा माल उपलब्ध नव्हता. तडजोड म्हणून त्यांनी २५ टनाची नवीन ऑर्डर दिली आणि एकूण २६ लाख ३१ हजार रुपये जमा केले. मात्र, आरोपींनी ३० ऑगस्ट २०२५ रोजी केवळ १२ टन माल पाठवला, जो अत्यंत निकृष्ट दर्जाचा होता. त्यामध्ये भेसळ, माती आणि पेरणीसाठी अयोग्य साहित्य मोठ्या प्रमाणात होते.

उर्वरित मालासाठी किंवा पैसे परत मिळवण्यासाठी मुथा यांनी वारंवार संपर्क केला असता, आरोपींनी पैसे देण्यास नकार दिला आणि अर्वाच्य भाषेत उत्तरे दिली. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर सुयश मुथा यांनी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात तक्रार दिली. पोलिसांनी संजय बाबासाहेब भगत, ओंकार संजय भगत, अरविंद सोपान विधाते, सारीका सोमनाथ शिंदे, बालुताई सोमनाथ जगताप आणि बालकृष्ण पंढरीनाथ चव्हाण या ६ संचालकांविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे. पोलीस निरीक्षक शरद जोगदंड या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

## कै.बि.दे.राठी राजस्थानी प्राथमिक विद्यालयाचा वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रम उत्साहात

बीड । प्रतिनिधी

दि.५ फेब्रुवारी - कै. बी.दे.राठी राजस्थानी प्राथमिक विद्यालयाचा वार्षिक स्नेह संमेलन कार्यक्रम अतिशय भव्य दिव्य अशा उत्साही वातावरणात पार पडला.या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संस्थेचे सचिव रामेश्वरजी कासट साहेब,तर प्रमुख अतिथी म्हणून बीड जिल्हा परिषद लेखा वित्त अधिकारी श्री.आबासाहेब घायाळ,नगरसेवक श्री .शुभमजी धूत,नगरसेवक श्री. नितीन साखरे,समाजसेवक श्री.अजय सवाई आणि युवा उद्योजक श्री.निलेश संचेती यांची उपस्थिती होती.सर्वप्रथम पाहुण्यांच्या हस्ते दीप प्रज्वलन आणि सरस्वती मातेचे व नटराज मूर्ती पूजन करण्यात आले. यानंतर कार्यक्रमाची सुरुवात पाहुण्यांच्या हस्ते हवेमध्ये गॅस फुगे सोडून करण्यात आली.कार्यक्रमाचे



प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक महेश पारिख सर यांनी केले.कार्यक्रमांमध्ये बालवाडी ते सातवीच्या विद्यार्थ्यांचा सहभाग होता त्यांनी देशभक्तीपर गीत, बालगीत,लावणी,घूमर, पारंपारिक गीत,तसेच छावा चित्रपटातील संभाजी महाराज, कवीकलश व औरंगजेब यांची भूमिका सादर करणारे गीत कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले गेले.हा वार्षिक स्नेहसंमेलन भव्य दिव्य स्वरूपात पार पडला गेला.या कार्यक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.पालक वर्ग सुद्धा खुश होता.यावेळी विद्यार्थ्यांवर बक्षीसांची खैरात पालकातर्फे करण्यात आली. यावेळी राजस्थानी सेवा समाज संस्थेचे सर्व पदाधिकारी का उपस्थित होते. ▶▶ पान २ वर...

## आमरसिंह पंडित यांच्या नेतृत्वात चव्हाणवाडीच्या विकासाची गाडी सुसाट

**बीड । प्रतिनिधी**

देशाला स्वातंत्र्य मिळून पंचाहत्तर वर्ष उलटूनही अनेक वाड्या वस्त्या विकासापासून कोसोदूर आहेत.आशीच आवस्था बीड तालुक्यातील चव्हणवाडी या गावची होती.

गेल्या आनेक वर्षापासून गावाला स्मशानभुमी नसल्याने मृत्यू पावलेल्या व्यक्तींचे अंत्यसंस्कार अक्षरशः वेड्याबाभळीत झाडे तोडून करावे लागत होते. आणि ही गोष्ट अत्यंत खेदजनक व क्लेशदाई होती परंतु ही बाब गावातील प्रतिष्ठित आण्णा मामा देवगुडे व माजी ग्राम. प सदस्य सखाराम घिगे यांच्या पुढाकाराने चव्हाणवाडी ग्रामस्थांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राज्याचे सरचिटणीस लोकनेते अमरसिंह पंडित साहेबांच्या निदर्शनास आणून दिली व आदरणीय साहेबांनी तत्काळ जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत मंजुरी देऊन गावाला स्मशानभूमीशेड बंधकाम करणे हे काम दिले ते आज प्रगती पथावर आहे. या पुढेही चव्हाणवाडी ते हनुमाननगर वस्ती रस्ता डांबरीकरण करणे. हनुमाननगर येथे अंगणवाडी बांधकाम करणे सभामंडप बांधकाम करणे असे अनेक विकासकामे करण्याचा शब्द आदरणीय भैय्या साहेबांनी दिला असल्यामुळं चव्हाणवाडी गावच्या विकासाची गाडी सुसाट धावत असल्याचे मत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नेते गणेश तोडेकर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे व्यक्त केले.



## कळसंबर येथे कुस्ती स्पर्धेसाठी राणा डोईफोडे यांच्याकडून चांदीची गदा बक्षीस

नेकनूर । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील कळसंबर येथे मेडची आई देवीच्या यात्रेनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या भव्य कुस्ती स्पर्धेत पाली जिल्हा परिषदेचे सदस्य राणा डोईफोडे यांनी मल्लांना प्रोत्साहन देण्यासाठी चांदीची गदा या स्वरूपात बक्षीस दिले.त्यांच्या या योगदानामुळे स्थानिक कुस्तीपटूंमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे. कुस्ती या पारंपारिक खेळाला राजाश्रय मिळावा आणि ग्रामीण भागातून दर्जेदार पैलवान घडावेत, या उद्देशाने राणा डोईफोडे यांनी ही मदत केली आहे. कुस्ती हा आपल्या मातीतील खेळ आहे, तो टिकला पाहिजे आणि वाढला पाहिजे,अशी भावना त्यांनी यावेळी व्यक्त केली. मेडची आई देवीची यात्रा कळसंबर गावची उज्वल आणि समृद्ध सांस्कृतिक परंपरा आहे. ही परंपरा जतन करण्यासाठी आणि ती अधिक वृद्धिंगत करण्यासाठी आपण सदैव प्रयत्नशील राहू, अशी ग्वाही देखील त्यांनी ग्रामस्थांना दिली. राणा डोईफोडे यांच्या या दातृत्वामुळे आणि सामाजिक कार्याबद्दल कळसंबर ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

